Asian Journal of Multidisciplinary Studies

ISSN: 2321-8819 (Online)
2348-7186 (Print)
Impact Factor: 1.498
Vol.4, Issue 5, April 2016

# आदिवासी अस्मिता आणि आदिवासी साहित्य

**अमर लक्ष्मण कांबळे**
**मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**हातकणंगले, जि.कोल्हापुर**

**ABSTRACT:** आदिवासींच्या अदिम संस्कृतिला प्राचीन मूल्यात्मक संचितांची वैभवषाली परंपरा आहे. ही वैभवषाली संस्कृती पून्हा निर्माण करायची असेल तर, ज्या संस्कृतीने आपले माणूसपण नाकारुन जगण्याचा अधिकार काढून घेतला त्या संस्कृतीला नकार दयावाच लागेल याची जाणीव आदिवासी नवषिक्षित पिढीला झालेला आहे .आदिवासी जणीव जागृती झालेल्या आदिवासींनी आदिवासी साहित्यातून आदिमतेचा वेध धेतला आहे.आदिवासी संस्कृतीच्या मूळापर्यत पोहोचून स्वतःच्या अस्तित्वाचा षोध धेण्याचा प्रयत्न आदिवासी साहित्याने केला आहे. आदिवासी साहित्य आणि अस्मिता यांचा परस्पर अनुबंधाचा विचार येथे केला आहे.

***KEYWORDS:* *आदिवासी, वनवासी, मूळनिवासी, उलगुलान, सुक्कासुकुम, तिरकमठा***

स्वातंत्र्योत्तर भारतात लोकषाहीच्या माध्यमातून सर्वसामान्य अषा सर्व उपेक्षितांच्या हक्क अधिकाराला संविधानिक संरक्षण निर्माण झाले. समतेचे ज्ञान,षिक्षण तळागाळापर्यंत पोहोचले. त्यामुळे विशमतेविरूध्द बोलणारा नवा समाज तयार झाला फुले,षाहू व आंबेडकर यांच्या विचाराने प्रभावीत झालेला हा वंचित समाज चौकस, जिज्ञासू बनला. त्याने युयुत्सू वृत्तीने संपूर्ण विशमव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या प्रचार प्रसार माध्यामाचे अवलोकन त्यांनी केले त्याची चिकित्सा केली मराठी साहित्याचेही चिकित्सक वृत्तीने अध्ययन केले मराठी साहित्यात आमच्या समाबांधवांचे चित्रण योग्य पध्दतीने आलेले नाही ते चित्रण संदेह आहे हे त्यांनी ओळखले आपल्या संस्कृतीविशयी जीवनाविशयी या नव्या विचारांच्या लोकांनी लेखन केले त्यामुळे मराठीत नवे साहित्य प्रवाह निर्माण झाले. मराठी साहित्यात साठोत्तरी कळात निर्माण झालेले साहित्य प्रवाह हे वंचिताचे,उपेक्षितांचे,दळलेल्या व भरडेलेल्या सर्वच दुःखीतांचे अर्थात प्रत्येकाच्या दुःखाचे संदर्भ मात्र वेगळे आहेत ग्रामीण जीवनाचे प्रष्न ग्रामीण प्रथा परंपरा, षेती, गावगाडा, षहरी प्रभाव, रोजगार यासारखे आहेत. दलितांचे दुःख आर्थिक आणि सामाजिक बहिश्कृततेचे आहे. स्त्रियांचे दुःख सर्वच जाती धर्मात मिळालेल्या दुय्यमत्त्वाचे आहेत. तसे स्त्रीत्त्वाच्या अस्तित्वाचे आहेत. आदिवासी समाजाचे प्रष्न काही वेगळेच आहेत. जंगलात राजा असणारा आदिवासी या देषाचा मूळनिवासी तरीदेखील तो वनवासी ठरविला जात असून त्याचे अस्तित्व नाकारणारा आदिवासी आम्हीही माणसेच आहोत हा अस्तित्वाचा प्रष्न घेऊन समोर उभा आहे. द[1]याखो[1]यात, जंगलकपारीत आपले संस्कृतीक जीवन निसर्गाला साक्षी ठेवून जाणारा आदिवासी हा अनेक समस्यांनी ग्रासलेला आहे. सर्वच दुःखी असले तरी प्रत्येकाच्या दुःखाचे संदर्भ वेगळे आहेत. म्हणूनच त्यांचे स्वतंत्र असे स्थान मराठी साहित्यालाही स्वीकारावे लागले. आदिवासी साहित्य हे प्रेरणा, संकल्पना स्वरूप या पातळीवर इतरांपेक्षा वेगळे आहे. अर्थात सर्वच प्रवाह आपली स्वंतत्र प्रवृती घेऊन निर्माण झालेले असतात. त्यामुळे परस्पर भिन्नता ही त्यामध्ये असतेच. आदिवासी साहित्याच्या अदिम प्रेरणा त्यांचे अदिम सांस्कृतिक अधिश्ठान,त्यांचे जीवन, त्यांचे भावविष्व यामुळे ते अधिक स्वायत्त झालेले दिसते. आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे साहित्य आहे. त्यांच्या गौरवषाली इतिहासाचे साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे या भूमिने प्रसविलेल्या आदिम वेदनेचे, जाणीवेचे षब्दरूप होय. आदिमत्व, निर्सग हे या साहित्याचे मूळस्त्रोत आहे. आदिवासीची आदिमता ही संवेदन निर्मिती आहे. डॉ. माहेष्वरी गावित म्हणतात. 'आदिमतेची संवेदना ही साहित्यनिर्मिती करत असते' आदिवासी हा षब्द आद्य म्हणजे सुरूवाती पासूनचा, मूळचा या अर्थाने स्वीकारतो. आदिवासी हे या देषाचे मूळचे आद्यनिवासी आहेत. प्राचीन कालखंडापासुन हा समाज भारतभुमीमध्ये राहतो. त्याला स्वतःची संस्कृती आहे. तो जंगलात राहतो. जंगलाचा राजा आहे, तो याभूमीचा भूमीपूत्र आहे. निर्सगाषी तादात्म्य पावलेला आदिवासी हा निर्सगाला देवता मानतो त्यांचे पूजन करतो.

आदिवासी समाजाला 'मूळनिवासी', 'जंगलाचे राजे', 'अदिम' 'मागासलेले हिंदू', 'गिरीजन' या नावानेही ओळखले जाते. अलिकडे त्यांना 'वऩवासी' या नावानेही संबोधले जाते. प्राचीन भारतात आदिवासी राज्ये होती. गोंड, भिल्ल, वारली हे राजे होते. त्यांच्या पराक्रमाच्या अनेक गाथा मौखिक रुपाने आदिवासी आजही गातात. आदिवासीचा इतिहास हा गौरवषाली आहे. आर्याच्या बरोबर अनेक वर्शे त्यांनी संघर्श केला. भारतीय स्वांतत्र्यलढयातही तितकेच सक्रिय होते. आदिवासी कला निपूण आहेत. नृत्य, चित्र, संगीत, या विशय ते अधिक सजग व कलाप्रिय आहेत. कला हा त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. परंतु ते निरक्षर आहेत, ते साधेभोळे आहेत, त्यांच्या अज्ञानाचा गैर फायदा घेऊन त्यांना प्रलोभने देऊन त्यांचे सर्वचपातळीवर षोशण केले गेले. किंबहूना अजूनही तो अन्याय अत्याचार होताना दिसतो. या विरुध्द प्राचीन काळापासून संघर्श व विद्रोह आदिवासी विरा केलेला आहे. बीरसा मुंडा, तंटया भिल्ल, भागोजी भिंगरा, भीमू कुमरा, राणी दुर्भावती, नारायणसिंह इत्यादी काहींचा इतिहास कोणी लिहिलाच नाही. उलट तो नश्ट करण्यात आला. परंतु हा आदिवासींचा पराक्रम नाकारता येणार नाही. याचीच प्रेरणा घेऊन आदिवासी जाणीव अधिक प्रगल्भ झालेली दिसून येते. निसर्ग, सांस्कृतिक, सामाजिक, गौरवषाली इतिहास व परिवर्तनवादी चळवळींच्या प्रेरणा घेऊन मराठीत आदिवासी साहित्य निर्माण झालेले दिसते.

प्राचीन समृध्द राजवैभवाच्या वाताहतीनंतर आदिवासींनी जंगलाचा आश्रय घेतला. यानंतरच्या पिढयांना अक्षरज्ञान न मिळाल्याने त्यांनी आपली वैभवषाली साहित्य परंपरा मौखिक रुपात जिवंत ठेवली. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हे साहित्य मौखिक रुपात संक्रमण होत राहिले. आदिवासी साहित्याचा अनादी काळापासून आदिवासींनी ही अदिम मौखिक साहित्य परंपरा जपलेली आहे. आणि आजही ती परंपरा तो सांभाळताना दिसतो आहे. आदिवासींच्या या मौखिक साहित्याला धर्म, संस्कृती व जीवनमूल्यांचे भक्कम अधिश्ठान आहे. काळाच्या ओघात या समृध्द परंपरेला रानटी ठरवून ही परंपराच दुर्लक्षित करण्याचा किंबहुना नाकाराण्याचा प्रयत्न हजारों वर्शे झालेला दिसतो. आर्य आणि अनार्याच्या संघर्शात आदिवासी आणि आदिवासी साहित्याला संपविण्याचा प्रयत्न चालू राहिला. याची वेदना आदिवासींच्या मनात सतत सलत राहिली. यातूनच स्वातंत्र्योत्तर काळात जे आदिवासी षिकले त्यांच्या साहित्यातून ती प्रथम व्यक्त होताना दिसते. हजारो वर्शाच्या उपेक्षिविशयी चीड आणि ही उपेक्षा ज्यांनी केली. त्यांची व्यवस्था न कारणे हे या चीडीमागे प्रयोजन होते. मुख्यत्वेकरून कवितेतून या भावना अधीक प्रगल्भपणे व्यक्त होताना दिसतात.

आज उघडया जंगलाप्रमाणे आदिवासीदेखील सर्वकंश उघडे जीवन जगतो आहे. मोलमजूरीवर आपली गुजराण करतो आहे. आजच्या आदिवासी षिक्षित पिढीसमोर आपला उज्ज्वल इतिहास आहे. नव्याने त्याचा तो षोधही घेत आहे. त्याला स्वतःचे भान आलेले आहे. या स्वजाणिवेतूनच तो आपल्या व्यथा, वेदना षब्दांच्या माध्यमातून उजागर करताना दिसत आहे. स्वातंत्र्योत्तर काळासुध्दा आदिवासींना वनवासी ठरविले जात आहे. ज्या भूमिपुत्रांनी इथली संस्कृती निर्माण केली, ती जिवंत ठेवली निसर्गावर जीवापलिकडे श्रध्दा ठेवली. ज्यांनी एकेकाळी राजवैभव भोगले. आपली समृध्द परंपरा विकसीत केली. या वैभवषाली परंपरेवरच हल्ले झाले. आदिवासींचा प्रखर इतिहास नश्ट केला. त्यांना वनवासी ठरविले गेले. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार केले. त्यांचे षोशण केले. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र या आन्याय, अत्याचार, षोशणाविरुध्द प्रतिक्रिया आदिवासी षिक्षित नवयुवक देऊ लागला. आपल्या व्यथा वेदना मांडू लागला. आपल्या गतगौरवषाली इतिहासांची तो निर्माण करण्याऱ्या वीर पुरुशांची प्रेरणा घऊन तो लिहू लागला. या बंडाचे निषान त्यांने प्रथम प्रेरणा घेउन तो लिहू लागला. या बंडाचे निषाण त्यांने प्रथम कवितेच्या माध्यमातून फडकावले. व आपल्या नकार नोंदविला. आदिवासी नव्या पिढीने षब्दांना आपले षस्त्र काव्य लेखन केलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने भुंजग मेश्राम, प्रभू राजगडकर, नेताजी राजगडकर, विनायक तुमराम, माधव सरकुंडे, वाहरु सोनावणे, गोंविद गारे, एल. के, मडावी, बाबाराव मंडावी, उत्तमराव सोनावणे, सुनील कुमरे, रवि कुलसिंगे, पुरुशोत्तम षेडमाके, प्रा. वामन षेडमाके, उशाकिरण आत्राम, कुसुम आलाम, वसंत कनाके, कृश्णकुमार चांदेकर, विनोद मोरांडे, चामुलाला राठवा इत्यादी व अन्य कवींनी आदिवासींच्या व्यथा वेदनांना षब्दरुप दिलेले आहे. भारतीय समाजव्यवस्था आदिवासींना वनवासी ठरवत आहे. आदिवासींना हा इथला मूळचा रहिवासी आहे. त्याची स्वतंत्र संस्कृती आहे. तो जंगलाचा राजा आहे. त्याच्या पराक्रमागे इथे गौरवषाली इतिहास निर्माण केला आहे. याचा जाणीवपूर्वक विसर पडत चालल्याचे दिसते. निसर्गाच्या सानिध्यात स्वच्छंदपणे जपणाऱ्या भोळया भावडया आदिवासींवर संधीसाधूनी, अन्याय अत्याचार केला, त्यांचे षोशण केले. त्यांच्या प्राचीन वैभवषाली इतिहासांच्या खुणा मिटवून टाकल्या. म्हणूनच आजचा तरुण आदिवासी आपलया परंपरा आणि इतिहास पुन्हा निर्माण करु इच्छितो आहे. कवी भुजंग मेश्राम लिहितात,

**" आमच्या सामर्थ्याचे गाणे झाडे बोलली, वारा बोलला**
**हे कळले रानात आलेल्या पावावाल्या**
**मग त्यांनी फोडला पावा अन् केली मषाल**
**कित्येक वर्शे त्यानंतर हे अरण्य जळत राहिले अखंड**
**तेव्हापासून आम्ही जमिनीत झालो भूमिगत " ( उलुगलान, प., 64)**

आदिवासींनी प्राचीन काळी समृध्द आणि वैभवषाली संस्कृती निर्माण केली. पण इथल्या व्यवस्थेने ती नश्ट केली. त्यांनी त्यांच्या स्वतःच्या जागेवरुन हाकलून लावले. तेव्हापासून आदिवासींनी जंगलांचा आश्रय घेतला. पूर्वी गोंड, भिल्ल, कातकरी, वारली हे राजे होते. पण आज त्यांच्या खुणा फक्त अवषेश रुपाने षिल्लक राहिलेल्या दिसतात. आदिवासींच्या अवनतीला जबाबदार कोण? आदिवासींवर भटकंती कोणी लादली ?यांचा आजचा आदिवासी तरुण षोध घेताना दिसतो. मेश्राम लिहितात,

**" ते आले तेव्हा, त्यांच्याकडे भटकंती होती**
**आणि आमच्याकडे इतिहास ते म्हणाले,**
**आपण सर्वच करु अदलाबदल**
**अन् बदलू जग, केला विष्वास,**
**आता त्यांच्याकडे आहे इतिहास अन्**
**आमच्याकडे विमुक्ती."                ( उलगुलान पृ. 85)**

आर्य बाहेरुन आले व आपल्या कपटनीतीने आदिवासींना फसविले. त्यांना बदलण्याचे आमिश दाखवून त्यांची गौरवषाली राज्ये त्यांनी बळकावली. आणि आदिवासींचा इतिहास नश्ट करुन त्यांना जंगलात हाकलून दिले. अनार्याची नगरे उध्वस्त केली व आपली नवी संस्कृती निर्माण केली. आदिवासींचा इतिहास नश्ट करुन वनवासी ठरविण्याचे प्रयत्न फक्त आर्याकडूनच झाले असे नाही, तर आर्या नंतर आलेल्या मोगल, पोर्तुगिज, मुस्लिम, इंग्रज आदि सामाज्रातही झालेले आहेत. अदिमता हे आदिवासींचे तत्व पुसण्यावी प्रक्रिया ही हजारो वर्शाची आहे. त्यांची आदिसत्ता नाकारण्यासाठीच त्यांनी वनवासी ठरविले गेले. महात्मा फुले यांनीसुध्दा या गोश्टीवर प्रकाष टाकताना म्हटलेले आहे.

**" गोंड भिल्ल क्षेत्री होते मूळधनी।**
**इरानी मागुनी आले तेथे ।।"( म. फुले समग्र वाङ्मय पृ. 416)**
**महात्मा फुले पुढे म्हणतात,**
**"षूर भिल्ल कोळी षराने तोडले**
**हाकलून दिले रानोवनी"       ( म. फुले समग्र वाङ्मय पृ. 457)**

याचा अर्थ असा की नंतर आलेल्या आर्यानी आदिवासींना युध्दात पराजित करून रानावनात हाकलून दिले. व त्यांची षेती नगरे बळकावली. आज जंगल दऱ्याखोऱ्यात राहणारे आदिवासी हे काही आपणहून रानावनात गेले नाहीत,तर त्यांना हाकलून लावले गेले आहे. हा आदिवासींचा इतिहास असताना त्यांना वनवासी ठरविले जात असल्याचे दिसते. हे अनेक षतकांचे दुःख आदिवासी कवींनी मांडले. वसंत कनाके लिहितात,

**"नाव ठेवलं वनवासी आम्ही तर आदिवासी**
**देषाची मूळ निवासी कसे होऊ षकतो वनवासी" ( सुक्कासुकुम  पृ 10)**

ज्याला घरदार नाही, संस्कृती नाही तो वनवासी आदिवासींची तर समृध्द पूर्व परंपरा असलेली दिसते. आमची समृध्द परंपरा असताना आम्ही वनवासी कसे? हा प्रष्न आता आदिवासी कवी विचारताहेत. व ज्यांनी ही परिस्थिती निर्माण केली त्याचा षोध घेऊन त्या पाठीमागील परंपरेची चिकित्सा करताना दिसतो आहे. आदिवासींच्या आजच्या परिस्थीती विशयी लक्ष्मण माने लिहितात, "आर्याच्य अनेक टोळयांची आक्रमणे दिर्घ काळापर्यत भारतावर होत राहिली. त्यांनी आपल्या वसतिस्थानासाठी जुन्या नगरांचा विदध्वंस केला,नद्यांचे पाट फोडून टाकुन नगरे नश्ट केली जंगले जाळून आदिवासींना विस्थापित केले. आर्यांनी या माणसांना माणूस न मानता असूर, राक्षस, दस्यू, ना अषी विषेशणे बहाल केली त्यांच्या स्त्रिया पळविल्या, मालमत्ता हरण केली दैवतांचे विकृतीकरण केले व या जमातींना रानावनात परागंदा हो या भाग पाडले. "आर्यानी आदिवासींची गौरवषाली परंपरी त्यांचा इतिहास वनवासी ठरविले. आजही "आदिवासी मेळे" भरवून आदिवासींना वनवासी ढरीवण्याचे काम अव्याहतपणे चालूच आहे. आदिवासी ही षापित माणसे असल्यासारखे त्यांच्याकडे पाहिले गेले. म्हणूनच वनवासी हा षब्द आदिवासींना वेदना देणारा त्यांची पूर्व परंपरा नाकारणारा वाटतो. चामूलाल राठवा लिहितात,

**" आदिवासी...**
**हा षब्द ते अषारीतीने उच्चारतात**
**त्यावेळी मला वाटते**
**तो महारोगास पर्यायी षब्द असावा! ( माझी सनद कुठे आहे? पृ. 2)**

आदिवासी चिकटलेली "आदिवासी" षब्दाची वेदनाच आज आदिवासींना संघर्शमुक्त करत आहे. आजही आदिवासींना महारोगयापेक्षा वाईट दृश्टीने पाहिले जाते. महारोगीही सार्वजनिक जीवनात मानावे जीवन जगू षकतो. पण आदिवासींच्या वाटयाला तेही नाही. आदिवासींचे आदिमत्त्वच लोकांना अजून नीट समजलेले नाही. याविशयी तुकाराम रोंगटे लिहितात, "दुर्देवाने आदिवासी षब्दाचा अर्थच अवस्थोला निटसा कळलेली नाही. आदिवासी म्हणजे आपले षूत्रू, प्रतिस्पर्धी वा  न पचणारे लोक असाच लोकांचा समज झालेला दिसतो. पण हे साफ खोटे आहे. आदिवासीनीच या देषाचे देषपण खऱ्या अर्थाने टिकवून ठेवले आहे. "आदिवासी हा वनवासी नाही त्याची उज्ज्वल परंपरा आहे. पण भारतीय समाजाने ती समजूनच घेतलेली नाही. खरेतर प्राचीन भारतीय संस्कृतीची आणि इतिहासाची जपणूक ही आदिवासींनीच केली. मात्र त्याच आदिवासींना संस्कृत आणि इतिहासापासून अदखलपात्र केले जात आहे. त्यांनी संस्कृतीच जतन केल त्यांनी इतिहास जपला त्यांनाच अदखलपात्र केले जात आहे. याची  सल आदिवासी लेखकांना आहे. आपल्या पुसल्या जाणाऱ्या इतिहासालाच आदिवासी कवींनी आपल्या कवितेतून उजागर केलेले आहे. कवी वसंत कुलसिंगे लिहितात.

**"मी वनवासी नाही**
**मी आदिवासी आहे**
**येथील राज्यकर्ती जमात**
**म्हणून इतिहास आहे. ( अन्याय पृ. 89)**

कवीचे मी वनवासी नाही हे सांगणे एकटयाचे नाही ते अखिल आदिवासींचे आहे ज्या आदिवासी राज्यांनी अनेक वर्शे राज्य करून आदिवासींना राज्यकर्ती जमात बनविले होते. मात्र आज हा इतिहास प्रस्थापिताकडून सोयिस्करपणे डावलून आदिवसींना वनवासी ठरविले जात आहे आदिवासी लेखक आपल्या पूर्व इतिहासाला उजाळा देऊन ठणकावून सांगताहेत की प्रस्थापितांनो इविहासाची पाने चाळून पाहा आम्ही वनवासी नसून मूळनिवासी राजकर्ते आहोत. आता आम्हीच आमच्या इतिहासाच्या पुर्नलेखनानंतर मात्र तुम्हाला आदिवासी हा षब्द आदराने उच्चारणे भाग पडेल. म्हणूनच सनातन व्यवस्थेला इषारा देताना बाबाराव मडावी लिहितात.

**"आदिवासींचा इतिहास**
**थट्टा करु नको राजा**
**'आदिवासी' हा पोरखेळ नव्हे...!          (मोहळ पृ. 38)**

आदिवासींचा गौरवषाली इतिहास आहे. आदिवासी आणि आदिवासींएत्तरांच्या संघर्शात हा आदिवासींचा इतिहास गाडला गेला. हे वास्तव असले, तरी आदिवासींनी आजही त्यांची जपणूक आपल्या संस्कृती, लोकवाङ्मयाच्या माध्यमातून जतन केला आहे. म्हणूनच आदिवासी कवी आपल्या गौरवषाली पंरपरेचा अभिमान व्यक्त करुन प्रस्थापितांची आदिमांची जी थट्टा चालविली आहे. त्याविशयी आपली चींड व्यक्त करुन आम्ही आदिवासी माणसेच आहोत हे ठासून सांगताना दिसताहेत. आदिवासी हा या देषाचा मूळनिवासी आहे. तो जंगलचा राजा आहे. भारतभूमीचा आदिवासींचा गौरवषाली इतिहास आहे. स्वतंत्र संस्कृती  आहे. आपल्या गतइतिहासाची व संस्कृतीचा त्याला अभिमान आहे. यामुळेच आदिवासी हा

वनवासी नसून उज्ज्वल इतिहासाचा वारसदार आदिवासी आहे. आदिवासी समग्र साहित्यातून हाच विचार प्रामुख्याने आदिवासी लेखक कवींनी मांडलेला दिसतो. त्यामुळेच लहू कटारी सारखा कार्यकर्ता लिहितो.

**''आम्ही आहोत, आद्यनिवासी...**
**वनवासी नव्हे, मूळनिवासी...''**

'वनवासी' ही संकल्पना आदिवासींचे अस्तित्व नाकारुन त्यांना हजारो वर्शे मागे नेणारी व पारंपरिक व्यवस्थेचे पालन करावयास लावणारी संकल्पना आहे. म्हणूनच आदिवासी कवी वनवासी नसून आपण आदिवासी असल्याने सिध्द करतो आहे. पण आज आदिवासींची पूर्व परंपरा नश्ट करुन त्यांचे विकृतीकरण केले जात आहे. याविशयी 'पताना' च्या मलपृश्ठावरील अभिप्रायात लोकनाथ यषवंत म्हणतात.

**'' आदिवासी इथले मूळ रहिवासी हे सूर्यसत्य , पण**
**सत्यालाच नाकारणारी ही तथाकथित स्वंयघोशित श्रेश्ठ मंडळी विष्वातले**
**आपणच श्रेश्ठ मानव असल्याचे सिध्द करण्यासाठी**
**मूळ रहिवाषांचाच विनाष करताहेत.'' (पताना मलपृश्ठ)**

ही प्रक्रिया अनेक षतकापासून सुरु असलेली दिसते. आजचा आदिवासी या अन्यायी श्रेश्ठत्त्वालाच आव्हान देताना दिसतो आहे. आपल्यावर व्यवस्थेने लादलेले वनवासीपण नाकारुन आपणही माणूस असल्याचे सिध्द करतो आहे. ही एक स्वागतार्हच गोश्ट आहे.

**''माझे अस्तित्त्व नाकारणाऱ्या वाझं संस्कृतिला**
**मी निग्रहपूर्व प्राणपणाने नकार दर्षवितो.'' (तिरकमठा पृ. 108)**

आदिवासींच्या अदिम संस्कृतिला प्राचीन मूल्यात्मक संचितांची वैभवषाली परंपरा आहे. ही वैभवषाली संस्कृती पून्हा निर्माण करायची असेल तर, ज्या संस्कृतीने आपले माणूसपण नाकारुन जगण्याचा अधिकार काढून घेतला व संस्कृतीला नकार दयावाच लागेल याची जाणीव आदिवासी नवषिक्षित पिढीला झालेली दिसते. आर्य आगमनपूर्वीपासूनच आपली समृध्द संस्कृती जपणाऱ्या आदिवासींना प्रस्थापितांनी संस्कृतीहीन म्हणून उपेक्षित ठेवले. षोशणाची नव सांस्कृतिक व्यवस्था मजबूत केली. या सांस्कृतिक व्यवस्थेला नाकारुन आता आदिवासी आपल्या पूर्व संचिताना षोध घेतना दिसतो आहे. हे पूर्वसंचितच आदिवासींना नव्या जगण्याचे बळ देईल असा विष्वास आदिवासी नव पिढीला वाटतो. म्हणूनच तो ही वांझ संस्कृती प्राणपणाने नाकारतो आहे. आदिवासी आता नव्या सांस्कृतिक संघर्शासाठी सज्ज झालेला आहे. 1980 नंतरच्या मराठी साहित्यात आदिवासी साहित्याचे योगदान महत्वाचे आहे.

डोंगर दऱ्यात राहणाऱ्या आदिवासी समाजामध्ये षिक्षण व आरक्षणामुळे स्वाभिमान जागृत झालेला दिसतो. आदिवासी संस्कृतीच्या मूळापर्यत पोहोचून स्वतःच्या अस्तित्वाचा षोध त्याने घेतला आहे. आदिवासी जणीव जागृती झालेल्या आदिवासी साहित्यातून आदिमतेचा वेध घेताना दिसतो. विषेशतः मराठी कवितेतून याची सुरुवात झालेली दिसून येते, आदिवासींनी वनवासी करणाऱ्या व्यवस्थेलाच हे नवे अव्हान त्याने निर्माण केले आहे. आदिवासी लोक हे या देषाचे मूळ निवासी आहेत. ते भूमीचे भूमीपुत्र आहेत. त्यांचा इतिहास गौरवषाली आहे. त्यांची संस्कृती आदर्षवत आहे. ते स्वायत्त व स्वयंभू आहेत. ते कोणाचेही व कोणत्याही संस्कृतीचे गुलाम नाही, त्यांची निसर्गावर निश्ठा आहे. ते रानावनात राहातात. निसर्गाला देव मानतात. म्हणून ते रानटी नाहीत. तीही माणसेच आहेत ही ओळख त्यांना पुन्हा निर्माण करावयाची आहे. त्यासाठी त्यांचा संघर्श अविरत सुरु आहे. मराठी साहित्यातही तो निर्माण झाला आहे. आदिवासी समाजाची ओळख नाकारणाऱ्यांना तसेच इतरांनाही ते ठणकावून सांगतात. आदिवासी हा वनवासी नाही तर तो आद्यनिवासी आहे ही आदिमतेची जाणीव मराठी आदिवासी साहित्यात विषेशतः मराठी कवितेत प्रकर्शाने दिसून येते.

**संदर्भ :**


मेश्राम भुजंग, 'उलगुलान' साकेत प्रकाषन, औरंगाबाद, दि्. आ. 1995
कनाके वसंत, 'सुक्का सुकुम' लोकासत प्रकाषन, यवतमाळ, प्र. आ. 2002
राठवा चामुलाल, 'माझी सनद कुठे आहे' भाशा संषोधन केंद्र, बडोदरा, प्र.आ. 2004
रोंगटे तुकाराम, 'आदिवासी साहित्यः नियतकालिकातील',डिंपल प्रकाषन,ठाणे प्र.आ. 2007
मुनघाटे प्रमोद,'आदिवासी मराठी साहित्य स्वरुप आणि समस्या' प्रतिमा प्रकाषन, पुणे, प्र.आ 2007
कुमरे सुनिल, 'तिरकमठा' गोंडवना साहित्य प्रकाषन, प्र. आ. 1991 पृ34
आलाम कुसुम,'राम आसवांचे तळे,मुद्रण बनहट्टी, नागपूर प्र.आ.1998
सबनिस श्रीपाल,'आदिवासी,मुस्लिम, खिष्चन साहित्य मीमांसा, अनुबंध प्रकाषन, पुणे, प्र.आ. 2007
मडावी बाबाराव,'पाखरं', प्रियांका प्रकाषन ,यवतमाळ प्र.आ.2009
मेश्राम भुजंग, 'उलगुलान' ,साकेत प्रकाषन,औरंगाबाद, द्वि.आ. 1995
सोनवणे बाहरू, 'गोधड' सुगावा प्रकाषन, पुणे, प्र.आ. 2006.
मडावी लटारी कवडू, ' पताना' सुगावा प्रकाषन, पुणे द्वि.आ.2003
चांदेकर कृश्ण कुमार, 'पतुसा' नभ प्रकाषन, अमरावती, प्र.आ.1999
अलाम कुसुम, 'बेडीबंद' हाकारा, पुणे, 1998 पृ..39
सोनवणे बाहरू, 'गोधड' सुगावा प्रकाषन, पुणे, प्र.आ. 2006
गावीत माहेष्वरी,'आदिवासी साहित्य' वाड्मय सेंवा प्रकाषन, नाषिक